नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक १७/०६/२०२२ (शुक्रवार)**

**(दुपार)**

---

## जबरी संभोग

**पो.स्टे. उमरेड :-** दिनांक ०७/०६/२०१८ चे १२:०० वा. ते १४.०० वा. चे सुमारास वय २५ वर्षीय पीडीत/फिर्यादी ही मागील ४ वर्षासुन आरोपी नामे- दिपेश प्रल्हाद पाथोडे, वय २७ वर्ष रा. उमरेड याला ओळखत असुन 'तुझासोबत लग्न करतो' असे म्हणुन आमिश दाखवुन फिर्यादी सोबत आरोपीने शारीरिक संबंध वेळोवेळी केले. तसेच फिर्यादीची मासीक पाळी थांबली असता तीने प्रेगान्युज वर चेक केले असता फिर्यादी गर्भवती असल्याचे समजले. तेव्हा फिर्यादीने आरोपीस गर्भवती असल्याची माहीती दिली असता आरोपीने हॉस्पीटल येथे नेवुन फिर्यादीचा गर्भपात केला. तसेच आरोपीने तिला लग्न करण्यास नकार दिला. आरोपीने फिर्यादी व त्याचे अनेक नग्न फोटो काढले असुन 'तु मला लग्न करण्यास फोर्स करू नको, नाहीतर ते सोशल मिडीयावर टाकुन तुझी बदनामी करीन' असे दि. १६/०६/२२ रोजी आरोपीने धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम ३७६(२)एन, ४१७, ३१३, ५०६ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला ताब्यात घेण्यात आले असून घटनास्थळ गणेशपेठ नागपूर शहर येथील असल्याने सदरचा गुन्हा हा पुढील तपास कामी नागपूर शहर पो.स्टे. गणेशपेठ यांच्या कडे सोपविण्यात येणार आहे. सध्या गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि शितल खोब्रागडे मो. क्र. ८३०८०८२०९४ या करीत आहे.

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**१) पो.स्टे. मौदा -** दिनांक १६/०६/२०२२ चे ०८.०० वा. चे सुमारास पो.स्टे. मौदा हद्यीत फिर्यादीयांची १६ वर्षीय अल्पवयीन मुलगी हीला अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नाईक श्रीराम डोईफोडे मो.हे करीत आहे.

**२) पो.स्टे. खापा -** दिनांक १५/०६/२०२२ चे ०६.०० वा. ते १२.०० वा. चे सुमारास पो.स्टे. खापा हद्यीत फिर्यादी यांची १७ वर्षीय अल्पवयीन मुलगी हीला आरोपी नामे- विक्रम ईश्वर वाघाडे, वय २१ वर्ष, रा. टेंभूरवाही याने लग्नाचे आमिष दाखवून फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. खापा येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नाईक श्रीराम डोईफोडे मो.हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

**पो.स्टे. मौदा** :— अंतर्गत २४ कि.मी. अंतरावरील आसोली येथे दिनांक १६/०६/२०२२ चे १५:३० ते १५:५० वा. दरम्यान आरोपी काळी पिवळी टॅक्सी गाडी क्र. एमएच— ३१/ऐपी—८०११चा चालक आरोपी क्र. १. ने आपल्या ताब्यातील सदर वाहन नागपूर भंडारा कडे जात असतांना लोकांच्या जीवितास धोका निर्माण होईल व येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस अडथळा निर्माण होईल अश्या स्थितीत रोडवर आपली गाडी अचानक उभी केली व मागे असलेला ड्रीम युगा मोटरसायकल क्र. एमएच—३६/ऐडी—०२४३ चे चालक— हरिदास विठ्ठल भुते(मृतक) वय ३० वर्ष रा. मारुती मंदिर जवळ उमरी इसापूर जि. भंडारा याने आपल्या ताब्यातील मोटारसायकल हळू केली असता त्याच्या मागे येणारे क्रेन क्र. एमएच—४९/बीआर—८२६६ चा चालक आरोपी क्र. २. ने आपल्या ताब्यातील क्रेन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवून त्याच्या समोर असलेला मोटरसायकला व त्यानंतर मोटरसायकल च्या समोर असलेल्या काळी—पिवळी टॅक्सी ला मागुन जबर धडक देवुन समोर अंदाजे २० ते २५ फूट ढकलत नेवुन अपघात केला. या अपघातात मोटार सायकल स्वार हरिदास विठ्ठल भुते हे क्रेन व टॅक्सीच्या मधात येवुन व केन खाली त्यांचे मोटरसायकल सह येवुन गंभीर जखमी होऊन जागीच मरण पावले. क्रेन व काळी पिवळी टॅक्सी मृतकाच्या अपघाती मरणास कारणीभूत ठरला.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस हवालदार शेलेश बेले पोस्टे मौदा यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २८३,२७९,३३६,३०४(अ) भादवि सहकलम १८४ मो.वा.का कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री अरविंद मोहोड मो. नं. ९३०७५३६३४४ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**